कोट टेकडी, तेर, ता.जि.धाराशिव या स्थळाचे भूसंपादन करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : स्मारक-२०२३/प्र.क्र.३०१/ई ६८१०५३/सां.का.३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १० ऑगस्ट, २०२६

वाचा :- १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.स्मारके-२०२३/ प्र.क्र.३०१/सां.का.३, दि.२३.११.२०२३.
२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.स्मारके-२०२३/ प्र.क्र.३०१/सां.का.३, दि.१४.०२.२०२४.
३. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांचे पत्र क्र. तंत्र २०२५/ सं.प./को.टे.भूमी/१०७४, दि.२५.०६.२०२६.

प्रस्तावना :-

कोट टेकडी हे धाराशीव जिल्ह्यातील तेर (प्राचीन तगर) या ऐतिहासिक गावातील एक अत्यंत महत्त्वाचे पुरातत्त्वीय उत्खनन स्थळ (Mound/Archaeological Site) आहे. प्राचीन काळी सातवाहन साम्राज्याच्या काळात तेर हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे एक मोठे केंद्र होते, आणि या वैभवशाली इतिहासाचे अनेक पुरावे या टेकडीच्या उत्खननातून समोर आले आहेत. त्यामुळे कोट टेकडी परिसराचे जतन-संवर्धन होणेकरीता स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत उपर्निर्दिष्ट क्र.१ अन्वये ₹१३,३८,६४,०६३/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच, उपर्निर्दिष्ट क्र.२ अन्वये ₹१३,७५,२७,५३५/- इतक्या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता व न्युनतम निविदा असणाऱ्या (+३.९१%) मे.गजराज कन्स्ट्रक्शन, लातूर यांच्या निविदेस मान्यता देण्यात आली.

तथापि, सदर स्थळ खाजगी मालकीचे असून भूसंपादन अभावी याठिकाणी संवर्धनाचे काम प्रलंबित होते. सद्यस्थितीत उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, धाराशिव यांनी निश्चित केलेल्या दरानुसार कोट टेकडी, तेर, ता.जि.धाराशिव या स्थळाचे एकूण क्षेत्र १.०५६ हे.आर (३ एकर २० गुंठे) भूसंपादन करण्यासाठी ₹३,४०,९१,२२८/- इतक्या रकमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत संचालनालयाने उपर्निर्दिष्ट क्र.३ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे. यानुसार उक्त प्रयोजनार्थ प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

कोट टेकडी, तेर, ता.जि.धाराशिव या स्थळाचे भूसंपादन करण्याकरीता येणाऱ्या ₹३,४०,९१,२२८/- (अक्षरी रुपये तीस कोटी चाळीस लक्ष एक्याण्णव हजार दोनशे अठ्ठावीस मात्र) इतक्या रकमेस या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२.	या प्रयोजनार्थ येणारा खर्च मागणी क्र. झेडडी-२, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, २२०५ कला व संस्कृती (००) १०३, पुरातत्वशास्त्र, (०१) (०६) राज्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाचे किल्ले व धार्मिक स्थळे यांची जपणूक व संरक्षण (कार्यक्रम) (२२०५ १३०२) २७-लहान बांधकामे या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर असलेल्या आर्थिक तरतुदीतून भागविण्यात यावा.

३.	संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०४.	हा शासन निर्णय विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग २, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग तीन मधील अनुक्रमांक ४ मधील परिच्छेद क्र. २७ (२) "अ" नुसार तसेच वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थसंकल्प-३, दिनांक ०९ एप्रिल, २०२६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

०५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०८१०१७१६००९२४३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NANDA MARUTI RAUT

Digitally signed by NANDA MARUTI RAUT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs,
2.5.4.20=1983A6357BDEA5C5091136D73EC0B1D7D99AF67DF3CCA676C00FAD04572B4AA9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BAF9D9317025580944685E047B9C52D64C532684054F19E1F02C374B78E1773F, cn=NANDA MARUTI RAUT
Date: 2026.08.10 17:17:50 +05'30'

(नंदा राऊत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. उपसचिव (सां.का.३), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. महालेखापाल -१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. महालेखापाल -२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.निवड नस्ती, सां.का.३.